# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 157/2024 दिनांक : 02.05.2024**

## 1)खुन :–

**तामसा :–** दिनांक 30.04.2024 रोजी 21.30 वा. सुमारास, **मौजे. चिकाळा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे मधुकर मारोतराव तुपेकर, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. चिकाळा ता. हदगाव जि. नांदेड,** यास घरगुती भांडणाच्या कारणावरून यातील नमुद आरोपीने दगडाने डोक्यात व अंगावर इतर ठिकाणी जबर मारहाण करून त्याचा खुन केला. वगैरे **फिर्यादी दिलीप मारोतराव तुपेकर, वय 45 वर्ष रा. चिकाळा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 38/2024 कलम 302 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री तुगावे, मो.नं. 9822179877** हे करीत आहेत.

## 2)शासकीय कामात अडथळा :–

**रामतीर्थ :–** दिनांक 01.05.2024 रोजी 11.15 वा. चे सुमारास, **नरसी बस स्थानक, ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बस चालक यास यातील नमुद आरोपीने व दोन अनोळखी महिला यांनी बस मधुन खाली का उतरवले या कारणावरून फिर्यादी यांचेशी हुज्जत घालुन शिवीगाळ करून शर्ट पकडुन मारहाण केली व कर्तव्य बजावत असतांना शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी नागनाथ विठ्ठलराव हत्ती, व्यवसाय एस.टी. महामंडळ बस चालक डेपो देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 102/2024 कलम 353,332,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री नरवाडे,** हे करीत आहेत.

## 3)मोबाईल चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 30.04.2024 रोजी पहाटे 03.00 वा. ते 06.00 वा. चे सुमारास, **विवेक नगर गुंजकर यांचे घरी नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घराचा दरवाजा उघडा ठेवुन झोपले असता त्यांचा रेडमी कंपणीचा मोबाईल किंमती 8,000/–रूपयाचा व नगदी 4500/–रूपये असा एकुण 12,500/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अविनाश गणपत लोकरे, वय 49 वर्षे, व्यवसाय नोकरी रा. धाराशीव ह.मु. विवेक नगर गुंजकर यांचे घरी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 180/2024 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2150 माळवे, मो.क्रं. 9970379878** हे करीत आहेत.

## 4)प्राणी संरक्षण अधिनियम :–

**इतवारा :–** दिनांक 30.04.2024 रोजी 22.15 वा. चे सुमारास, **बैलमार्केट जुनागंज इतवारा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्यांच्या ताब्यातील भंगारचे गोडाऊन मध्ये बिना परवाना बेकायदेशिररीत्या कत्तल केलेल्या गुरे ढोरांच्या जनावरांची हाडांची विल्हेवाट लावण्याच्या उदेशाने गुरे ढोरांची हाडे आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री देविदास बापुराव बिसाडे, ने. पोस्टे इतवारा** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 117/2024 कलम 5,5 (ब) 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/802 शेख, मो. नं. 8975992449** हे करीत आहेत.

## 5)फसवणुक :–

**वजिराबाद :–** दिनांक 26.06.2022 ते 04.05.2023 चे दरम्यान, **नविन कौठा व वजिराबाद चौक नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस क्रिप्टो करंन्सी व फॉरेक्स ट्रेडिंगचे वेगवेगळे खोटे वॉलेट कॉर्ड हे खरे असल्याचे दाखवुन त्यांच्या मोबाईल मध्ये अनस्टोपेबल नावाच्या वॉलेटमध्ये 54 बिटकॉईन असल्याचे दाखवुन ज्याच्या एका बिटकॉईनची किंमत जवळपास 25,00,000/–रूपये असल्याचे भासवुन क्रिप्टो करंन्सी व फॉरेक्स ट्रेडिंग मध्ये गुंतवण्यास लावले व गुंतवलेले रूपये परत मागीतले असता ते परत न करता फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी सुनिल प्रभाकर आनंतवार, वय 30 वर्षे, व्यवसाय व्यापार, रा. म्हाडा कॉलनी नवीन कौठा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं. 197/2024 कलम 420,406,34 भादवि सह महाराष्ट्र ठेविदाराच्या हित संबधाचे रक्षण करण्याबाबत अधिनियम 1999 कलम 3 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री लोणीकर, मो.नं. 9422336474** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**मुखेड :–** दिनांक 22.02.2014 रोजी ते दिनांक माहे 06.2016 दरम्यान, **नांदेड व पुणे येथे रा. हांगरगुळी ता. उदगीर जि. नांदेड ह.मु. मनोहर टॉकीज गल्ली ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु जाड आहेस तुझे वागणे बरोबर नाही असे म्हणुन माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये असे म्हणुन उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला वगैरे **फिर्यादी 40 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 143/2024 कलम 498 (अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2223 कदम, मो.क्रं. 8390695468** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)कुंडलवाडी :–** दिनांक 01.05.2024 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **मौ. बामणी थडी ता. धर्माबाद जि. नांदेड येथे**, यातील नमुद नऊ आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी 14,970/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/नारायण मारोतराव शिंदे, ने. पोस्टे कुंडलवाडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 46/2024 कलम 4,5 म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/शेकडे**, हे करीत आहेत.

**2)देगलुर :–** दिनांक 01.05.2024 रोजी 18.55 वा. चे सुमारास, **शारदा नगर फिरोज दिन टॉकीजवळ ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या श्रीदेवी नाईट नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी 1700/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/संजय विश्वनाथ केंद्रे, ने. पोस्टे स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे केंद्रे** गुरनं 189/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2562 पत्रे, मो.नं. 9823203404** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड